JKXAGW

वेळ : २ तास गुण : ५०

प्रश्न १. खालीलपैकी कोणतेही दोन प्रश्न सोडवा. (२०)

अ) कथा म्हणजे काय ते सांगून कथेचे विविध घटक सविस्तर लिहा.

ब) आपल्याच देशात निर्वासिताप्रमाणे जीवन जगणाऱ्या दलित, आदिवासी, कातकरी समाजाचे दु:ख "कथाविविधा" मधील कथांमधून कसे प्रगट झाले ते सोदाहरण विशद करा.

क) 'नागर जीवनातील सुखदु:खाचे दर्शन घडविण्यात "कथाविविधा" मधील कथालेखक यशस्वी झाले आहेत.' साधकबाधक चर्चा करा.

ड) स्त्रीचे माणूस म्हणून जगणेच नाकारणाऱ्या पुरुषप्रधान समाज व्यवस्थेवर "कथाविविधा" कथासंग्रहातील लेखिका प्रहार करताना दिसतात. सोदाहरण विशद करा.

प्रश्न २. खालीलपैकी कोणत्याही दोन टीपा लिहा. (१०)

अ) "चिरोटी" कथेतील भाऊबंदकी

ब) "गांधीजी अकरा सप्टेंबर २००१" मधील कल्पनाविस्तार.

क) "पाझर" कथेतील गावकरी

ड) "गुडदाणी" कथेतील अंधश्रद्धा.

प्रश्न ३. अ) खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर ६० ते ८० शब्दात वर्तमानपत्रासाठी बातमी तयार करा. (४)

१) जोशी - बेडेकर महाविद्यालयात संगीतकार कौशल इनामदार यांचा कार्यक्रम पार पडला.

२) मुसळधार पावसामुळे जनजीवन विस्कळीत.

ब) खालील उताऱ्याचे मराठीत भाषांतर लिहा. (४)

This life is beautiful. A man should make it more beautiful. He should help the needy people as per his capacity. His body should be strong and healthy by doing exercises and yogasanas. He should Know that no other happiness is there like the health. "His mind should become stable by prayer. He should get mental peace by good behaviour. His speech should be well-cultured. His intellect should get developed by knowledge. He should be endowed with character.

P.T.O.

**pdfMachine**
**Is a pdf writer that produces quality PDF files with ease!**
Produce quality PDF files in seconds and preserve the integrity of your original documents. Compatible across nearly all Windows platforms, if you can print from a windows application you can use pdfMachine.
Get yours now!

क) खालील विषयावर ४० ते ५० शब्दात कार्यालयीन टिप्पणी लिहा. (४)

अण्णाभाऊ साठे महामंडळातील लिपिक श्री. सुरेश कांबळे यांना त्यांच्या मुलीच्या लग्नासाठी पन्नास हजार रुपये इतकी रक्कम हवी आहे. ही रक्कम त्यांच्या प्रॉव्हिडंट फंडातून हवी आहे. गेली पन्नास वर्षे श्री. कांबळे या महामंडळात कायमस्वरूपी सेवेत आहेत. या माहितीच्या आधारे वरिष्ठांना सादर करावयाची कार्यालयीन टिप्पणी लिहा.

प्रश्न ४. खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर २०० ते २५० शब्दात निबंध लिहा. (८)

१) माझा आवडता चित्रपट

२) सुवर्ण महोत्सवी महाराष्ट्र

३) माझ्या जीवनातला अविस्मरणीय प्रसंग !

❖❖❖❖

pdfMachine
Is a pdf writer that produces quality PDF files with ease!
Produce quality PDF files in seconds and preserve the integrity of your original documents. Compatible across nearly all Windows platforms, if you can print from a windows application you can use pdfMachine.
Get yours now!